# Financial Resolution & Deposit Insurance (FRDI) Bill 2017: "बेल इन'' म्हणजे बँकेतील सर्वसामान्याच्या पैशावर दरोडा ?

**प्रा.डॉ.प्रदीप पंजाबराव दंदे*** & **प्रा.डॉ.विजय दलपतराव कापसे****

*राज्यशास्त्र विभाग प्रमुख, विदर्भ यूथ वेलफेअर सोसायटी अमरावती द्वारा संचालित, महिला कला वाणिज्य महाविद्यालय चांदुर रेलवे,जिल्हा अमरावती- 444904, (संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती संलग्न)

** अर्थशास्त्र विभाग प्रमुख, विदर्भ यूथ वेलफेअर सोसायटी अमरावती द्वारा संचालित, महिला कला वाणिज्य महाविद्यालय चांदुर रेलवे,जिल्हा अमरावती- 444904, (संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती संलग्न)

Received Dec. 10, 2017 Accepted Jan. 08, 2018

भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी विडीओकान, एस्सार,भूषण स्टील सारख्या अनेक मोठ्या कार्पोरेट कंपन्यांना दिलेले कर्ज न फेडल्याने स्टेट बैंक ऑफ इण्डिया,पंजाब नेशनल बैंक,बैंक ऑफ इंडिया अश्या सार्वजनिक क्षेत्रातील 30 बँकांचा नॉन परफोर्मिंग असेटस् (एनपीए) 8.50 लाख कोटींवर रुपयांवर पोहोचला.रिलायन्स कम्युनिकेशनचे अनिल अंबानी व अदानी समूह यांच्याकडेही विविध बँकांचे 75000 कोटी थकीत आहेत.किंगफिशर किंग प्रसिद्ध उद्योगपती विजय मल्ल्या भारतीय बँकाना 9000 कोटीचा चुना लावून लंडनला पलायन केले,परिणामी सार्वजनिक क्षेत्रातील बँका डबघाईला आल्या आहेत. त्यातून मार्ग काढण्यासाठी सरकारने सुरवातीला " बेल आउट " च्या माध्यमातून विविध कम्पन्यांचे 1.14 लाख कोटी रुपयांचे कर्ज (writt–off) माफ़ केले.तर बँकांना मजबुती देण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये अधिक भांडवल गुंतवण्याचा निर्णय सरकारने घेतला आणि त्यासाठी 2.11 लाख कोटीची तरतूद करण्याची घोषणा अर्थमंत्री अरुण जेटली यांनी केली होती, त्यानंतरही बँकेतील एनपीए ची परिस्थिती निवळली नाही.बँकअधिकारी,उद्ध्योजक, सत्ताधीश,आणि मिडिया यांच्या संगनमताने तयार झालेल्या " क्रोनि कॅपिटालीझमने "- सार्वजनिक क्षेत्रातील बँकाना डबघाईस आणले आहे.त्यातुन मार्ग काढण्यासाठी फायनान्सियल रिजोल्युशन & डिपासिट इन्सुरंन्स(एफआरडीआय) विधेयक आणले.त्यात बेल इन तरतूद आहे, ती शोले चित्रपटाची आठवण करून देते.गब्बर सिंगचा शोले आठवतो का ? शोले चित्रपटातिल कालियाच्या, "अरे ओ शंकर,अरे ओ ढोलीया, क्या लाये हो...अनाज लाया हु मालिक...मुट्ठीभर अनाज ??......नहीं नही ...... सारा का सारा अनाज लाया मालिक'' अश्या बळजबरीने लगान मागणाऱ्या कलियाच्या डायलागची आठवण करून देते. एफआरडीआय विधेयकातील"बेल इन" तरतूद बँकेतील ठेवीदारांना पैसे काढण्यास अटकाव करणारी आहे.उदा.तुमचे बँकेत बचत खाते व फिक्स डीपासिट म्हणून दहा लाख रुपये असल्यास तुम्हाला दहा लाख न मिळता केवळ एक लाख रुपयेच मिळतील. उर्वरित रक्कम हि इक्विटीत किंवा अर्ध-इक्विटी सारख्या इतर वित्तीय साधनांमध्ये रूपांतरित होईल व भविष्यात देण्याचे सांगितले जाईल. परंतु ज्या बँक – कंपन्या लिक्विडेशन मध्ये गेल्या त्या बँकेतील ठेव/इक्विटी ही " कंगाल बँकेचा पुढील तारखेचा कधीही न वटणारा चेकच " ठरणार आहे. त्यामुळे " बेल इन '' म्हणजे बँकेतील सर्वसामान्यांच्या पैशावर टाकलेला दरोडाच आहे ? सायप्रस या देशातील जनतेची बन्केतिल 50% रक्कम " बेल इन " मुळे बुडाली होती.

**अमेरिकेतील मंदी व बेल इन**

2008 साली अमेरिकेतील इन्व्हेस्टमेंट बँक लेहमन ब्रदर्स दिवाळखोर झाल्याने अमेरिकेसह जगभरातील अनेक देशात मंदी आली होती.त्यामंदीतून बाहेर येण्यासाठी अमेरिकेने आधी "बेल आउट" धोरण स्वीकारले.परतु त्यामुळे बँन्कांची स्थिति न सुधारल्याने अमेरिका व् G-20 देशांनी Financial Stability Board स्थापून " बेल इन " चे धोरण स्वीकारले. फ्रान्स, जर्मनी, इटली, नेदरलँड्स, स्पेन, स्वित्झर्लंड, हाँगकाँग, युनायटेड किंगडम (यूके) आणि युनायटेड स्टेट्स (यूएस) यासारख्या देशांनी एफएसबीने सांगीततेल्या सात आंतरराष्ट्रीय मानकानुसार रिझॉल्यूशन अमलात आणली आहेत.जपान आणि कॅनडा यांनी काही प्रमाणात हे धोरण स्वीकारले. दुसरीकडे, अर्जेटिना, ऑस्ट्रेलिया, ब्राझिल, चीन, इंडोनेशिया, दक्षिण कोरिया, मेक्सिको, सौदी अरेबिया, सिंगापूर, दक्षिण आफ्रिका आणि तुर्की या देशांनी एफएसबी धोरणाची अंशतः अंमलबजावणी केली. जागतिक पातळीवरील महत्वाच्या देशात अशी परिस्थिती असताना आर्थिक साक्षरतेचा लवलेश नसलेल्या भारतात तोच कित्ता एफआरडीआय अवलंबवु पाहत आहे. वास्तविकता भारतासारख्या विकसनशील उदयोन्मुख अर्थव्यवस्था असलेल्या राष्ट्रासाठी बेल इन तरतूद योग्य नाही. भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील सर्वात मोठी बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया(एसबीआय) जागतिक स्तरावरील 100 बँकांमध्ये 55 व्या स्थानावर आहे आणि या बँकेकडे इतर देशांच्या तुलनेत प्रचंड (493 अब्ज डॉलर) मालमत्ता आहे.याउलट,चीनमधील "चार मोठ्या " सरकारी बँका म्हणजे औद्योगिक आणि व्यावसायिक बँक ऑफ चायना (3.4 ट्रिलियन डॉलर), चीन कंस्ट्रक्शन बँक कॉर्पोरेशन(3 ट्रिलियन डॉलर), अॅग्रीकल्चरल बँक ऑफ चायना (2.8 ट्रिलियन डॉलर) आणि बँक ऑफ चायना(2.6 ट्रिलियन डॉलर) , एवढीच संपत्ती, आहे. जपानची मित्सुबिशी यूएफजे फायनान्शियल ग्रुप (2.58 लाख कोटी), अमेरीकाची जेपी मॉर्गन चेस (2.49 ट्रिलियन डॉलर्स) आणि यूकेच्या एचएसबीसी (2.37 ट्रिलियन डॉलर)एवढी आहे. अश्यास्थितीत ज्या देशात आर्थिक साक्षरता जास्त आहे त्या G-20 देशासाठी बेल इन उपयुक्त ठरू शकते,भारतात नव्हे?

**FRDI-2017 कशासाठी ?**

FRDI बिलाचा मुख्य उद्देश सध्या अस्तित्वात असलेल्या Diposit Insurance And Credit Guarantee Corporation ( DICGC) च्या ऐवजी Resolution Corporation स्थापन करणे हा आहे.एफआरडीआय विधेयक दिवाळखोरीच्या बाबतीत बँक, विमा कंपन्या, नॉन-बँकिंग वित्तीय सेवा (एनबीएफसी) कंपन्या आणि स्टॉक एक्स्चेंजसारख्या वित्तीय संस्थांची देखरेख करण्यासाठी एक चौकट तयार करण्याचा प्रस्ताव आहे.एफआरडीआय मसुदयातील "रेझोल्यूशन कॉर्पोरेशन",बँका व इतर वित्तीय संस्थांच्या प्रक्रियेची देखरेख करेल आणि बँकांना दिवाळखोर होण्यापासून रोखेल. डीआयजिसीआय प्रमाणे ते एक महामंडळ असेल.बँकांचे दायित्व रद्द करणे,दायित्वाच्या अटी व शर्तीत बदल करणे,प्रसंगी " बेल इन '' ची परवानगी देणे,भविष्यात बँकामधे NPA वाढणार नाही यावर लक्ष ठेवणे,एनपीए वाढल्यास वर्षभराच्या आत त्यावर निर्णय देणे,दिवाळखोर कंपन्यांच्या कर्जात कपात (Haircut) करण्याची परवानगी देणे.तसेच अत्यंत विदारक परिस्थितीत असणारया बँकाना लिक्विडेशन मधे टाकणे आणि प्रसंगी त्या फर्म बंद करणे, इत्यादि कामे रिजोलुशन कॉर्पोरेशन कडे सोपवण्यात आली आहे.

प्रस्तावित विधेयकानुसार सार्वजनिक क्षेत्रातील बँका व खासगी बँकासोबतच ,विमा कंपन्या,म्युच्युअल फंड,पेन्शन फंड व इतर वित्तीय संस्था, "रेझोल्यूशन कॉर्पोरेशन" च्या अधिकारक्षेत्रात आणल्या आहेत.(ज्या सध्या या कक्षेत येत नव्हत्या) सध्यस्थीतीत कॉर्पोरेट मंत्रालय,रिज़र्व बँक,डीआयसीजिआय ही संस्था बँका आणि कम्पन्या यांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवते.त्यासाठी संसदेने काही कायदे पारित केले आहे.व वेळोवेळी त्या कायद्यात सुधारणाही केल्या आहेत (1) Banking Regulation Act 1949, (2) Deposit Insurance And Credit Guarantee Corporation Act 1961 (3) Banking Regulation (Amendment) Act 2017 (4) Insolvency And Bankruptcy Act 2016 (5) Insolvency And Bankruptcy (Amendment) Act 2017 यातील बँकिंग रेगुलेटिंग कायद्यात रिजर्व बँकेला सक्षम करण्यासाठी नुकतीच सुधारणा केली.या सुधारणा करण्यापूर्वी सुप्रीम कोर्टाकडे कँपन्यांच्या एनपीए संबंधी मोठ्या प्रमाणात खटले दाखल झाल्याने दिवाळखोर कंपन्याची प्रकरणे हाताळण्यासाठी सुप्रीम कोर्टाने राष्ट्रीय कंपनी कायदा लवाद स्थापन करण्याची शिफारस सरकारला केली होती. त्यानुसार 1 जून 2016 ला राष्ट्रीय कंपनी कायदा लवाद (National Company Law Tribunal ) स्थापन केले.परंतु NCLT ने निर्णय देताना धोरण ठरविण्यासाठी Resolution Corporation स्थापन करण्याच्या सूचना सरकारला दिल्या त्यानुसार कॉर्पोरेट मंत्रालयाने एफआरडीआय विधेयक आणले आहे. या विधेयकानुसार एक Resolution Corporation स्थापन करण्यात येईल. हे महामंडळ सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील बँका,विमा कम्पन्या,व शेअर बाजार अश्या वित्तीय संस्थावर नियंत्रण ठेवेल. Resolution Corporation मधे एक अध्यक्ष,वित्त मंत्री,आरबिआय गवर्नर ,इन्शुरन्स क्षेत्रासाठी इन्शुरन्स रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट ऑथॉरिटी (आयआरडीए), सिक्युरिटीज ॲण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) सिक्युरिटीज फर्म आणि म्युच्युअल फंडासाठी आणि पेन्शन फंड रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट ऑथॉरिटी (पीएफआरडीए),सिडबी,व्यावसायिकांचे दोन प्रतिनिधि असे या महामंडळात सदस्य असतील. हे महामंडळ एनपीए बाबत एनसीएलटीला शिफारसी करेल तसेच कंपन्या व बँकाबाबत सर्वंकष धोरण आखेल.परंतु या एफआरडीआय विधेयकाला विरोध झाल्याने ते संसदेच्या जॉइंट पार्लमेंटरी कमिटी (Joint Parliamentary Committee-JPC) कड़े विचारार्थ पाठविले आहे. दरम्यान संसदेच्या हिवाळी अधिवेशनात नोव्हेंबर मध्ये काढलेला अध्यादेश Insolvancy and Bankruptcy (Amendment) Bill 2017 म्हणून 29 डिसेंम्बर ला लोकसभेत पारित केला. या सुधारणा विधेयकानुसार लिक्विडेशन मध्ये जाणाऱ्या कंपन्याना त्यांच्याकडे असलेले थकीत ड्युज व त्यावरील व्याज भरले तरच लिक्विडेशनची बोली लावण्याची परवानगी या कँपन्यांना राहणार आहे.अनैतिक कम्पनीस आयबीसीच्या तरतुदींचा गैरवापर किंवा विचलित करण्यास प्रतिबंध करणे हा याविधेयकाचा उद्देश आहे असे वित्तमंत्री अरुण जेटली यांनी विधेयकावर बोलताना म्हटले.

**"बेल इन" – वादाचा मुद्दा**

एफआरडीआय विधेयकात कलम 52 व 53 मध्ये बेल इन चे प्रावधान आहे.व हाच विरोधाचा खरा मुद्दा आहे. काय आहे बेल इन ? बँकांना बेल इन परवानगी मिळाल्यास बँकां सर्वसामान्यांनी बँकेत ठेवलेला पैसा काढण्यास प्रतिबंध करू शकते. A "bail-in" is when bank accounts are frozen and then seized in order to prop up the bank… a "bail-in" is what happened in Cyprus. It is when savings are STOLEN . बेल इन नुसार बँकांचे ठेवीदारा प्रतीचे असणारे दायित्व (Liability ) राहणार नाही.तसेच काही प्रकरणात या दायीत्वाच्या अटी,शर्तीत सुधारणा करून याची वर्गवारी करण्याची मुभादेखील बँकाना देण्यात येणार आहे.त्यामुळे सर्वसामान्यांनी अत्यंत विश्वासाने बँकेत ठेवलेल्या ठेवी परत घेताना स्वातंत्र्य राहणार नाही. सध्या डीआयसीजीसी अंतर्गत एक लाख पर्यंत विमा संरक्षण आहे. प्रस्तावित एफआरडीआय विधेयकातही विमा संरक्षण एक लाख ठेवले आहे.त्यामुळे ठेविदाराना त्यांच्या ठेवी सुरक्षित राहतील कि नाही याबाबत विधेयकात स्पष्टता नाही.त्यामुळे बेल इन हा वादाचा मुद्धा आहे.

**दिवाळखोर कंपन्या**

कॉर्पोरेट कंपन्यांनी बँकांकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड न केल्याने साडेआठ लाख कोटी नोन परफोरमिंग असेट निर्माण झाला,त्यामुळे बँकांचे कम्बरडे मोडले. सर्वात जास्त एनपीए असणाऱ्या कम्पन्यात भूषण स्टील (44,478 कोटी रुपये), एस्सार स्टील (37,284 कोटी), भूषण पॉवर आणि स्टील (37,248 कोटी), आलोक इंडस्ट्रीज (22,075 कोटी), एमटेक ऑटो (14,074 कोटी रुपये) मोनेट इस्पात (रु. 12,115 कोटी), लॅन्को इन्फ्रा (44,364.6 कोटी), इलेक्ट्रोस्टील (10,273.6 कोटी रुपये), एरा

इन्फ्रा (10,065.4 कोटी रुपये), जिप्पी इन्फ्राटेक (9,635 कोटी रुपये) एबीजी शिपयार्ड (6,953 कोटी रुपये) आणि ज्योती स्ट्रक्चर्सने (5,165 कोटी) ,विडीओकान इंडस्ट्रीज(45102 कोटी)जीएमआर ग्रुप (47976 कोटी),एस्सार,नागार्जुना आईल,जयप्रकाश इंडस्ट्रीजउत्तम गल्वा मेटलिक्स, आयव्हीआरसीएल, एसईएल मॅन्युफॅक्चरिंग, कॅस्टेक्स टेक्नॉलॉजिज, ऑर्चिड फार्मा, रुची सोया, उषदेव इंटरनॅशनल, कोस्टल पेपर आणि युनिटी इन्फ्राप्रोजेक्ट्स यासह इतर काही कर्जबुडव्या कम्पन्या आहेत.

## NPA’s PSB बँक

मोठ्या उद्योजकाना कर्ज दिलेल्या स्टेट बैंक ऑफ इण्डिया,आयडीबीआय बँक,पंजाब नशनल बँक , इंडियन ओव्हरसीज बँक, यूको बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, सेंट्रल बँक ऑफ इंडिया,बँक ऑफ बरोडा , देना बँक, युनायटेड बँक ऑफ इंडिया आणि कॉर्पोरेशन बँक व् खाजगी क्षेत्रातील आयसीआयसीआय ,एक्सिस बैंक, याबँकात एनपीए वाढला आहे. 8.50 लाख कोटी एनपीएच्या तुलनेत सहा लाख कोटी एनपीए सार्वजनिक क्षेत्रातील(पीएसबी) बँकात आहे.एकट्या स्टेट बँकेत 1 लाख 88 हजार कोटी रुपये एनपीए आहे.
देशातील सर्वात मोठे कार्पोरेट घराणे म्हणून ओळख असलेल्या अंबानी बंधू पैकी अनिल अंबानी यांच्या नेतृत्वातील Reliance Communication industries -RCOM वर 45,000 कोटी रुपये कर्ज आहे. म्हणून मुंबईतील रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्टरचा विज प्रकल्प अदानी समूहाला 19 हजार कोटी रुपयाला नुकताच विकला.तर चीनच्या डेवलपमेंट बँन्केकडून घेतलेले 20000 कोटी रूपये कर्ज ओवर ड्यू झाल्याने बँकेने रिलायन्स विरोधात राष्ट्रीय कंपनी कायदा लवादाकडे धाव घेतली.शिवाय भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील बँकानीही त्यांच्याकडे कर्ज परतफेडीसाठी तगादा लावला आहे.त्यामुळे अनिल अम्बानी यानी दूरसंचार क्षेत्रातील कम्पनी जानेवारी/फेब्रुवारी 2018 च्या दरम्यान बंद करीत असल्याचे व् त्यांच्याकडे असणारे स्पेकटम,व् काही मालमत्ता विकून कर्ज बोजा कमी करण्यात येणार असल्याचे प्रसिद्धि माध्यमाना सांगितले होते.त्यांनतर काही दिवसांनी मुकेश अंबानी यांनी आरकॉम विकत धेण्याचे घोषित केले.याविक्रीतून आरकॉम वरील 45,000 कोटी पैकी 25,0000 कोटी चा बोजा कमी करण्याचा रिलायन्सचा प्रयत्न आहे.

### भारतात आर्थिक साक्षरता कमी

भारतातील नागरिकांचा बँकेवर अत्यंत विश्वास (Trust)आहे.त्यामुळे कष्टाने कमावलेला पैसा बँकेत सुरक्षित आहे,या भावनेने ते बँकेत पैसा जमा करतात. अश्यास्थितीत सर्वसामान्यांच्या बचत व ठेवी जर क्रोनि कॅपिटेलीझममुळे दिवाळखोर झालेल्या कम्पन्या व बँकांना सुस्थितीत आणण्यासाठी इक्विटीत बदलत असतील, तर बेल इन ची तरतूद भारतीय बँकांच्या विश्वासाहर्तेवर गालबोट लावणारी ठरेल ? भारतात नोकरदार,संघटीत व असंघटीत क्षेत्रातील कामगार,बचत गट,पेन्शनर्स,अश्या ठेवीदारांचा 60 % तर सरकारच्या विविध योजनांचा 15 % पैसा सार्वजनिक बँकेत आहे.महत्वाचे म्हणजे देशभरातील 30 कोटी जनधन खात्यातच एकाहत्तर हजार कोटी रुपये बँकांत जमा आहे. व्यापारी व अन्य व्यावसायी बँकेत पैसा गुंतविण्या ऐवजी अन्य व्यवसायात गुंतवतात बँकेत पैसे ठेवत नाहीत.भारतात आर्थिक साक्षरता असलेल्यांची संख्या अत्यंत कमी आहें.आणि जीएसटी व नोटाबंदीमुळे भारताची अर्थव्यवस्था आधीच हेलकावे घेत आहे. अशास्थितीत भारतासारख्या विकसनशील उदयोन्मुख अर्थव्यवस्था असलेल्या राष्ट्रासाठी बेल इन ची तरतूद योग्य नाही.ज्या देशात आर्थिक साक्षरता जास्त आहे अश्या G-20 देशासाठी ती उपयुक्त ठरू शकते.

### लोकशाही मुल्यांचा विसर

भारताने स्वातंत्र्य,समता व न्याय या तत्वत्रयीवर आधारित लोकशाही स्वीकारली आहे. व्यक्तीची प्रतिष्ठा हा भारतीय संविधानाने मूलाधार मानला.त्यामुळे जनहित नजरेपुढे ठेवून संसद कायदे होतील. स्वातंत्र्यापूर्वी स्वीकारलेल्या मूल्ये ,आदर्श व स्वप्नांचा तो आविष्कार असेल असे मानले जात होते,काही कालखंड तसे झालेही.1990 पासून भारताने मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारल्याने नंतरच्या काळात कल्याणकारी राज्याचा सामाजिक न्यायाचा पोत बदलला. डंकेल ते 100% एफडीआयचे धोरण मुक्त अर्थ व्यवस्थेने सुरू केलेले कॉर्पोरेट लोकशाहीचे अर्धवर्तुळ पूर्ण करण्यासाठी म्हणून की काय एफआरडीआय बिल आणल्या गेले,अशी शंका येते ? भारतात डीआयसीजीआय हि संस्था असताना एफआरडीआय बिल का आले असेल, तर या पूर्वीच्या कायद्यात “ बेल इन ” ची तरतूद नव्हती एवढेच.एकीकडे बँकांनी शेतकऱ्याना कर्ज न दिल्याने सावकारी पाशात कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्यांना आत्महत्या करावी लागत आहे तर दुसरीकडे याच बँका क्रोनी कॅपिटेलिझम पुढे लाल कारपेट (Red Carpet )घेवून उभ्या आहेत. क्रोनि कॅपिटेलिझमने भारताची पारदर्शी व् प्रतिस्पर्धी अर्थव्यवस्था पार खिळखिळी केलीे,असे रिझर्व बँकेचे माजी गवर्नर रघुराम राजम यांनी नुकतेच केलेले वक्तव्य फार बोलके आहे. म्हणूनच एफआरडीआय बिल हे सर्वसामान्याच्या हितापेक्षा बैंक व् दिवाळखोर कंपन्यांना वाचवण्यासाठी आणल्या गेले,हे चित्र लोकशाही एक जिवनपद्धती(way of life) म्हणून स्वीकारलेल्या भारतात कल्याणकारी राज्याचा सारीपाट मोडीत काढत कॉर्पोरेट लोकशाहीत रुपांतरीत (Democracy Transform Welfare to Corporate) करण्यासाठी सत्ताधाऱ्याना लोकशाही मूल्याचा विसर पडला आहे,हेच या विधेयकातून स्पष्ट होते.

## Conclusion/समारोप

भारतातील दिवाळखोर कम्पन्यामूळे सार्वजनिक क्षेत्रातील बँकांत उद्भवलेल्या एनपीएच्या समस्यातून मार्ग काढण्यासाठी एफएसबीच्या आंतरराष्ट्रीय मानकाप्रमाणे रीजोलुशन कार्पोरेशनची स्थापना करण्यास कुणाचेही दुमत नाही.पण बँका व कंपन्याच्या आयुष्यात नव्या स्वप्नांची पहाट उगवण्यासाठी जनतेच्या पैशावर दरोडा घालणारी“बेल इन” तरतूद म्हणजे “रोगापेक्षा इलाज लयभारी”आहे.कारण सदर विधेयक आहे तसे पारित झाले तर रिजोलुशन कॉर्पोरेशन बँकाना दिवाळखोर कंपन्याच्या कर्जात 50-60 %( haircuting) कपात करण्याची परवानगी देऊ शकते.तसे

झाल्यास साधारणत: पाच-सहा लाख कोटी कर्ज कपात होण्याची शक्यता आहे.व ही तूट सर्वसामान्यांनी बँकांत,म्युच्युअल फंडात, शेअर मार्केट मध्ये गुंतवलेल्या पैशातून भरून काढण्यात येणार आहे.अर्थात बँका सुस्थितीत येईपर्यंत ठेवीदारांना पैसे काढण्याची मुभा राहणार नाही. 1961 च्या डीपाजीट इंसुरन्स एंड क्रेडिट गारंटी कारपोरेशन ऍक्ट नुसार 1993 पासून बँकेतील ठेवीदारांना एक लाख विमा संरक्षण होते.त्यात नैसर्गिक वाढ Natural Grouth लक्षात घेता आजघडीला 10 लाख एवढे विमा संरक्षण मिळणे अपेक्षित आहे.परन्तु प्रस्तावित विधेयकात एक लाखच ठेवले आहे.अमेरिकेने बेल इन चे धोरण स्वीकारले तेव्हा तेथील नागरिकांच्या ठेवी वर $2.50,000 डॉलर विमा संरक्षण दिले आणि दर पाच वर्षाने त्यात सुधारणा करण्याची तरतूद सुद्धा केली आहे.तसे कुठलेच संरक्षण एफआरडीआय विधेयक देत नाही.त्यामुळे अर्थमंत्री अरुण जेटली जनतेचा पैसा बँकेत पूर्णत: सुरक्षित आहे असे कितीही सांगत असले तरी या विधेयकातिल “बेल इन” तरतुदीमुळे सायप्रस प्रमाणे भारतातील सर्व सामान्य ठेविदाराना आपल्या कष्टाच्या कमाईच्या पैश्यावर पाणी सोडावे लागेल, हे निर्विवाद सत्य आहे.

## Reference

1. http://www.thehindubusinessline.com/money-and-banking/18-psbs-among-top-20-banks-with-highest-gross-npa-ratios-care-ratings/article9821624.ece
2. http://www.business-standard.com/article/economy-policy/how-crony-capitalism-impacts-india-rbi-governor-rajan-explains-114081400156_1.html
3. .http://www.thehindubusinessline.com/economy/crony-capitalism-or-economic-growth/article9560345.ece
4. http://www.epw.in/engage/article/frdi-bill-2017-issues-and-concerns
5. http://azimpremjiuniversity.edu.in/SitePages/pdf/APU-Working-Paper-Series-5-curbing-crony-capitalism-in-India.pdf
6. https://en.wikipedia.org/w/index.php?title=Special:ElectronPdf&page=Crony+capitalism&action=show-download-screen
7. https://timesofindia.indiatimes.com/business/india-business/parliament-passes-companies-amendment-bill/articleshow/62136272.cms
8. http://www.firstpost.com/business/bank-npa-trend-in-7-charts-bad-loans-at-state-run-banks-may-be-peaking-select-private-peers-see-rise-4218813.html
9. https://cpim.org/views/3-years-modi-government-boon-corporate-defaulters
10. .Bailout https://www.investopedia.com/terms/b/bailout.asp#ixzz52Yloph31
11. *http://www.marketwatch.com/story/germany-oks-plan-to-make-creditors-prop-up-banks-2014-07-09?link=MW_home_latest_news*
12. http://www.prsindia.org/uploads/media/Bankruptcy/Insolvency%20and%20Bankruptcy%20Code%20Amendment%20Bill%202017.pdf
13. https://www.ndtv.com/business/bankruptcy-ordinance-promotes-clean-business-finance-ministry-1780984
14. http://www.thehindu.com/opinion/op-ed/banking-on-legislation/article20005363.ece
15. http://www.thehindu.com/opinion/op-ed/a-flawed-rescue-act/article18572991.ece
16. https://www.rbi.org.in
17. www.nclt.gov.in/
18. www.mca.gov.in/
19. http://www.thehindu.com/profile/author/Meera-Nangia-5468/
20. www.prsindia.org
21. www.loksabha.nic.in/
22. www.finmin.nic.in/
23. https://www.ndtv.com/india-news/lok-sabha-passes-insolvency-and-bankruptcy-code-amendment-bill-1793764
24. http://www.tribuneindia.com/news/business/ibc-amendment-bill-introduced-in-lok-sabha/520210.html
25. https://economictimes.indiatimes.com/industry/banking/finance/banking/new-ibc-provisions-to-deepen-losses-for-banks-report/articleshow/61782226.cms
26. http://epaper.loksatta.com/1484353/indian-express/29-12-2017#page/10/1
27. http://www.livemint.com/Opinion/4AYBWrd3m9RukcEGik53mL/Much-ado-about-bailin-and-FRDI-Bill.html
28. http://www.thehindubusinessline.com/money-and-banking/18-psbs-among-top-20-banks-with-highest-gross-npa-ratios-care-ratings/article9821624.ece
29. https://maharashtratimes.indiatimes.com/editorial/adanis-buy-reliance-infrastructures-mumbai-power-business/articleshow/62215020.cms
30. //economictimes.indiatimes.com/articleshow/61043258.cms?utm_source=contentofinterest&utm_medium=text&utm_campaign=cppst
31. https://kashmirreader.com/2017/12/30/on-the-bail-in-provisions-of-the-frdi-bill-a-review/
32. http://www.achieversrule.com/2017/06/frdi-bill-weapon-to-fight-against-financial-crisis.html
33. http://www.livemint.com/Politics/cV5b2m37rJZB7iXJtbdDwK/FRDI-Bill-Arun-Jaitley-says-deposits-will-be-protected.html